**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.18/09/2026

***गणेशोत्सवाला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी Bappa.org उपक्रमात सहभागी होण्याचे***
***महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन***

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा आणि सामाजिक एकात्मतेचा अविभाज्य भाग आहे. महाराष्ट्राची वैभवशाली सांस्कृतिक अस्मिता असलेल्या गणेशोत्सवाला राज्य शासनाने 'राज्य महोत्सव' म्हणून दर्जा दिला आहे. महाराष्ट्राच्या या गौरवशाली परंपरेला जागतिक स्तरावर नेणे तसेच महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला युनेस्कोचा वारसा दर्जा व यासंदर्भातील अन्य जागतिक मानांकने प्राप्त करून देण्यासाठी राज्य शासनामार्फत व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. गणेशोत्सवाची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची सामाजिक बांधिलकी, विविध कला-कौशल्ये, धार्मिक व सांस्कृतिक वारसा तसेच पर्यावरणपूरक उपक्रम यांची माहिती जागतिक स्तरावर पोहोचविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली पुरातत्व संचालनालयामार्फत Bappa.org हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा तसेच विविध गणेशोत्सव मंडळांच्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची नोंद व माहिती जागतिक स्तरावर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, गणेशभक्त, नागरिक, सामाजिक संस्था तसेच गणेशोत्सवाशी संबंधित विविध घटकांनी Bappa.org या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. या अधिकृत मंचावर गणेशोत्सवासाठी संबंधित घरगुती व सार्वजनिक परंपरा, गणेशमूर्ती स्थापना, सजावट, हस्तकला, चालीरीती, कला सादरीकरण, खाद्य परंपरा, आठवणी, सांस्कृतिक उपक्रम, पर्यावरणपूरक उपक्रम, छायाचित्रे व व्हिडीओ नागरिकांनी Bappa.org वर अपलोड करून आपला सहभाग नोंदवावा तसेच ९१३६१७२६८१ या WhatsApp क्रमांकावरही नागरिकांना सदर माहिती अपलोड करून आपला सहभाग नोंदविता येईल. नोंदणी करणाऱ्या नागरिकांना शासनाचे अधिकृत Digital Cultural Preserver Certificate देण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाची ओळख केवळ देशाच्या विविध भागांतच नव्हे, तर जागतिक पातळीवर पोहोचविण्यासाठी नागरिकांचा व गणेशोत्सव मंडळांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व संबंधितांनी Bappa.org या उपक्रमात सहभागी होऊन महाराष्ट्राच्या समृद्ध गणेशोत्सव परंपरेचे जागतिक स्तरावर दस्तऐवजीकरण व प्रसार करण्यासाठी योगदान द्यावे.
आपल्या गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जगभर पोहोचविण्यासाठी Bappa.org उपक्रमात सहभागी होण्याचे व गणेशोत्सवाला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याचे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.